अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड | शनिवार
०४.०७.२०२६

# वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १५४ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### आंजनारी घाटात ट्रेलरचा भीषण अपघात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**रत्नागिरी** – रत्नागिरीतील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग वरील आंजनारी घाटात शुक्रवारी (३ जुलै) सकाळी भीषण अपघात घडला. पोलीस, अग्निशमन दल आणि स्थानिक यंत्रणांच्या मदतीने राबविण्यात आलेल्या बचावमोहीमेत चालकाची सुखरूप सुटका करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास रत्नागिरीहून गोव्याच्या दिशेने कोटेड कॉईल घेऊन जाणारा ट्रेलर आंजणारी घाटातील बसथांब्याजवळ पोहोचला. त्याचवेळी ट्रेलरचे ब्रेक निकामी झाल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ट्रेलर थेट संरक्षक कठड्यावर जाऊन धडकला.

## फडणवीस, तुमचा आमदार, लोकांच्या मृत्यूवर फिदीफिदी हसतो अन...

### राज ठाकरे अमित साटमांवर संतापले : भाजपच्या लोकांना सत्तेचा माज आलाय!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मुंबई आणि उपनगरात गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर वाढला असून ठिकठिकाणी झाड कोसळण्याच्या किंवा खड्डयांमुळे अपघात झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत.

चेंबूर येथे २९ जून रोजी शाळेच्या बसवर झाड कोसळल्यामुळे एका ११ वर्षांच्या निष्पाप मुलाचा मृत्यू झाला होता. तर साकीनाका येथे २ जुलै रोजी एका उघड्या मॅनहोलमध्ये पडून अस्लम शेख नावाच्या व्यक्तीला आपला जीव गमावावा लागला.


या दोन दुर्दैवी घटनांनंतर मुंबई महानगरपालिकेच्या कारभारावर सर्व स्तरातून तीव्र टीका होत आहे. सामान्य मुंबईकरांमध्ये संतापाचे वातावरण असतानाच, लोकप्रतिनिधींमध्ये मात्र या गंभीर परिस्थितीचे गांभीर्य नसल्याचे एक धक्कादायक उदाहरण समोर आले आहे.

मुंबईतील विधिमंडळात सध्या राज्याचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. या दोन्ही घटनांवरून अधिवेशनात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये वादळी चर्चा झाली. विरोधकांसह सत्ताधाऱ्यांनीही मुंबई महानगरपालिका प्रशासनाविरोधात कमालीची नाराजी व्यक्त केली.

मात्र, याच दरम्यान भाजप मुंबईचे अध्यक्ष आणि आमदार अमित साटम यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे, ज्यामध्ये झाड कोसळण्याच्या आणि मॅनहोलच्या घटनांचा उल्लेख सुरू असताना अमित साटम हसताना दिसत आहेत. या असंवेदनशीलतेवरून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी थेट फेसबुक पोस्ट करत राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर हल्लाबोल केला आहे. भाजपच्या लोकांना सत्तेचा माज आलाय राज ठाकरे यांनी म्हटले आहे की, देवेंद्र फडणवीस, भारतीय जनता पक्षाच्या केंद्रातील लोकांना सत्तेचा माज आला आहे, हे पूर्व , पश्चिम , उत्तर , दक्षिण भारतातील लोकं सर्रास बोलत आहेत. केंद्रातील लोकं वाट्टेल तसे वागत आहेत याचा राग लोकांच्या मनात होता आणि आहेच.

## केंद्राची मोठी कारवाई : यूएपीए अंतर्गत पाकिस्तानातील २३ जण दहशतवादी घोषित

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**नवी दिल्ली** – केंद्र सरकारने बेकायदेशीर कारवाया (प्रतिबंध) कायदा (यूएपीए) अंतर्गत जैश-ए-मोहम्मद, लष्कर-ए-तैयबा आणि इतर दहशतवादी संघटनांशी संबंधित २३ जणांना अधिकृतपणे 'दहशतवादी' घोषित केले आहे. यासंदर्भातील अधिकृत आदेश जारी करण्यात आला आहे.

यूएपीएनुसार, एखादी व्यक्ती दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असल्याचा विश्वास केंद्र सरकारला वाटल्यास, त्या व्यक्तीला 'दहशतवादी' म्हणून घोषित करण्याचा अधिकार सरकारला आहे. अशा घोषणेनंतर राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए) आणि इतर तपास यंत्रणांना संबंधित व्यक्तींची मालमत्ता गोठवणे, निधीपुरवठ्याचे मार्ग बंद करणे, शस्त्रांवरील प्रवेश मर्यादित करणे तसेच त्यांच्याशी संबंधित मालमत्ता जप्त करण्याची कारवाई करता येते.

यापूर्वी यूएपीए अंतर्गत केवळ संघटनांनाच दहशतवादी घोषित करण्याची तरतूद होती. मात्र, २०१९ मध्ये करण्यात आलेल्या दुरुस्तीनंतर व्यक्तींनाही दहशतवादी घोषित करण्याची तरतूद करण्यात आली.

जैश-ए-मोहम्मदशी संबंधित दहशतवादी जैश-ए-मोहम्मदशी संबंधित म्हणून मसूद इलियास काश्मिरी, मोहम्मद मुसद्दिक उर्फ डॉक्टर, मुफ्ती मोहम्मद असगर खान उर्फ अबू साद, हाफिज अब्दुल शकूर उर्फ कारी जर्रार, अब्दुल्ला जेहादी, गुलाम फरीद, मौलाना इमदाद उल्लाह मक्की आणि वसीम नूर जाट यांचा समावेश करण्यात आला आहे. लष्कर-ए-तैयबाशी संबंधित दहशतवादी लष्कर-ए-तैयबाशी संबंधित म्हणून फिरदौस अहमद भट, हारून रशीद गनाई, बिलाल अहमद मीर, अबिद कयूम लोन, नझीर अहमद गुज्जर, अब्दुल रऊफ उर्फ हाफिज अब्दुल रऊफ, अशफाक अहमद, हाफिज खालिद वलीद, मौलाना सैफुल्ला खालिद, मोहम्मद याकूब, मौलाना युसूफ तैबी, ओवैस फारूज, कारी याकूब शेख, राणा इफ्तिखार आणि मोहम्मद शहीद फैसल यांचा समावेश आहे.

## टीईटी पेपर फुटी प्रकरण : उत्तर प्रदेशातून तिघांना अटक, एकूण ७ जण ताब्यात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**ठाणे** – महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२६ च्या कथित प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणाचा तपास करणाऱ्या महाराष्ट्र पोलिसांच्या विशेष तपास पथकाने आणखी तीन जणांना अटक केली आहे. त्यामुळे या प्रकरणात आतापर्यंत ताब्यात घेतलेल्या आरोपींची एकूण संख्या ७ झाली आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी शुक्रवारी दिली.

विशेष तपास पथकाने सोनू सिंह, मिथुन सिंह आणि कपिल दहिया या तिघांना उत्तर प्रदेशातून अटक केली. या त्रिकुटाला गुरुवारी स्थानिक न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. नवीन अटकेसह या प्रकरणात आतापर्यंत एकूण सात जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

अनेक राज्यांत जाळे २८ जून रोजी होणारी टीईटी परीक्षा पेपर फुटल्याचे उघडकीस आल्यानंतर तसेच ठाण्यातून तिघांना अटक केल्यानंतर आदल्या दिवशी पुढे ढकलण्यात आली होती. एसआयटी तपासात रॅकेटचे जाळे दिल्ली, आग्रा, बिहार, हरयाणामध्ये पसरल्याचे समोर आले आहे.

महाराष्ट्रातील ६ लाख विद्यार्थ्यांना फटका मुख्य सूत्रधार विजेंद्र गुप्ता आणि त्याच्या इतर साथीदारांचा शोध घेण्यासाठी एसआयटीने अनेक राज्यांमध्ये पथके रवाना केली आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

नीट-यूजी पेपर फुटीच्या राष्ट्रीय पातळीवरील गोंधळानंतर आता टीईटी पेपर फुटीचे हे प्रकरण समोर आले असून याचा फटका महाराष्ट्रातील जवळपास ६ लाख उमेदवारांना बसला आहे.

### खडका प्रकल्पात बुडालेल्या युवकाचा मृतदेह १५ मिनिटांत शोधला

## राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची धाडसी कामगिरी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





**वरुड** – बेनोडा (शहीद) पोलीस ठाणे हद्दीतील खडका पाक नदी प्रकल्पात बुडालेल्या २२ वर्षीय युवकाचा मृतदेह जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा आपत्ती प्रतिसाद पथक यांनी अवघ्या १५ मिनिटांत शोधून काढला. अत्यंत धोकादायक परिस्थितीत राबविण्यात आलेल्या या शोधमोहिमेमुळे पथकाच्या तत्परतेचे आणि कौशल्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मृत युवकाचे नाव दीपक मंगल धुर्वे (वय २२) रा.जामगाव असे आहे. गुरुवारी दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास खडका प्रकल्प परिसरात युवक बुडाल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियंत्रण कक्षाला मिळाली. त्यानंतर जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या आदेशानुसार तसेच निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद पथक तातडीने घटनास्थळी रवाना झाले. दुपारी सुमारे ४ वाजता पथकाने घटनास्थळी पोहोचून परिस्थितीचा आढावा घेतला. प्राथमिक माहितीनुसार युवक पाण्याच्या विसर्गासमोरील सुमारे २० फूट खोल टाकीत पडल्याचे समोर आले. टाकीमध्ये उभ्या लोखंडी सलाखा असल्याने शोधकार्य अत्यंत धोकादायक ठरत होते. मात्र, सर्व सुरक्षा उपायांचा अवलंब करत प्रशिक्षित गोताखोरांनी गडाच्या साहाय्याने शोधमोहीम सुरु केली आणि अवघ्या १५ मिनिटांत दीपक धुर्वे यांचा मृतदेह बाहेर काढण्यात यश मिळिवले.

त्यानंतर मृतदेह पुढील पंचनामा व अन्य कायदेशीर कार्यवाहीसाठी बेनोडा पोलीसांच्या ताब्यात देण्यात आला. या दुर्घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती.

संपूर्ण शोध मोहीमेदरम्यान पोलीस प्रशासन, महसूल विभाग तसेच जामगाव येथील संजय कुमरे, पोलीस पाटील विजय गेडाम आणि स्थानिक नागरिकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या यशस्वी शोधमोहीमेत विशाल निमकर, कौस्तुभ वैद्य, मुकेश सदाशिव, सचिन पवार, दीपक भोईटे, चैतन्य पोहाणे, प्रशांत गायकवाड, गणेश कास्देकर, गोकुळ मुंडे आणि मनीष उताणे या राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद पथकातील सदस्यांनी सहभाग घेतला.

## तुकाराम मुंढेच्या आदेशाला कोर्टात चॅलेंज, उच्च न्यायालयात याचिका दाखल

### मनमानी, अधिकारांच्या गैरवापराचा आरोप

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – अन्नसुरक्षा आणि मानके कायद्या अंतर्गत प्रतिबंधित खाद्यपदार्थांच्या निर्मिती, वाहतूक आणि विक्रीमध्ये सहभागी असलेल्या आरोपी विरोधात मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्याबद्दल अन्न व औषध प्रशासन विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी आदेश जारी केले होते.

मात्र या आदेशाच्या कायदेशीर वैधतेला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान देण्यात आले आहे. अशातच तुकाराम मुंढे यांचा आदेश अवैध ठरवून रद्द करण्यात यावा, अशी मागणी या याचिकेच्या माध्यमातून न्यायालयात करण्यात आली आहे. तुकाराम मुंढे यांचा आदेश मनमानी, एकतर्फी व सामान्यांच्या अधिकारांचा दुरुपयोग करणारा दरम्यान, तुकाराम मुंडे यांनी अन्नसुरक्षा आणि मानके कायद्यातर्गत १२ जून २०२६ रोजी आदेश जारी करून प्रतिबंधित खाद्यपदार्थांचे उत्पादन, त्यात अर्थसहाय्य पुरवठा व वाहतूक करणारे, तसेच त्यासाठी गोदाम पुरवणारे व किरकोळ विक्री करणाऱ्या विरोधात मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्याचे आदेश दिले होते.



# रस्त्याची अक्षरशः झाली चाळण : वाहन चालविणे धोकादायक

## शहरातील न्यायालयाकडे जाणाऱ्या मार्गाची दुर्दशा : नागरिक त्रस्त

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाकडे जाणारा तसेच शहरातील मुख्य वस्त्यांना जोडणारा महत्त्वाचा रस्ता गेल्या काही वर्षांपासुन निकृष्ट दर्जाच्या कामामुळे अत्यंत खराब अवस्थेत पोहोचला आहे. ठिकठिकाणी मोठे खड्डे, उखडलेला डांबरी थर आणि पावसामुळे साचणारे पाणी यामुळे नागरिक, वकील, न्यायालयीन कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना दररोज मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

या रस्त्याचे काम काही वर्षांपूर्वी करण्यात आले होते. मात्र, कामाच्या दर्जाबाबत सुरुवातीपासूनच प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. आज परिस्थिती अशी आहे की संपुर्ण रस्त्याची अक्षरशः चाळण झाली असून पावसाळ्यात वाहन चालविणे धोकादायक बनले आहे. दुचाकीस्वार घसरुन अपघात होण्याच्या घटना घडण्याची शक्यता वाढली असुन पादचाऱ्यांनाही जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

विशेष म्हणजे हा रस्ता न्यायालयाकडे जाणारा असल्याने दररोज शेकडो नागरिक, वकील आणि अधिकारी या मार्गाचा वापर करतात. शहरातील अनेक निवासी वस्त्यांनाही हा रस्ता जोडत असल्याने वाहतुकीची मोठी वदळ असते. तरीही संबंधित यंत्रणेकडून कायमस्वरूपी दुरुस्ती करण्यात आलेली नाही.




स्थानिक नागरिकांनी या रस्त्याची तातडीने उच्च दर्जाने पुनर्बांधणी करण्याची मागणी केली आहे. निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित ठेकेदाराची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी जनतेनी केली होती परंतु चोर चोर मावस भाऊ एक मेकांचा बचाव करत गेले परंतु पुढे नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार रस्ता उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे. वरुड येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाकडे जाणारा रस्ता पावसाळ्यात खड्ड्यांनी व्यापला असून नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

---

## दिनविशेष

०४/०७/१९९६ : अब्दुल कलाम यांना ए.पी.जे. आर्यभट्ट पुरस्कार जाहीर.

### सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -१४७८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने -१३२३०० रु.(१०ग्रॅम)

चांदी - २,३४,०८१ रु. (प्र.किलो)

### कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी | १६५० | २००० |
| गहू | २५०० | ३००० |
| तूर | ६१०० | ६३९० |
| मूग | ६५०० | ७००० |
| उडीद | ६००० | ७००० |
| हरभरा | ५६०० | ५९०० |
| सोयाबिन | ४१०० | ४३५० |
| बाजरा | २००० | २३०० |
| तिळ | ८२०० | ९३०० |
| भुईमूग | ५१५० | ५३५० |
| मका | २२०० | २३०० |

---

## ध्रितीस किडझी आणि ध्रिती ग्लोबल स्कूल येथे

# शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी ध्रितीस किडझी आणि ध्रिती ग्लोबल स्कूल येथे विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शाळेच्या प्रवेशद्वारावर आकर्षक सजावट, फुगे, पुष्प वर्षाव आणि टिळा लावून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.



यावेळी विद्यार्थ्यांनी आनंदाने शाळेत प्रवेश केला. पालकांनीही आपल्या पाल्यांच्या शिक्षणाच्या नव्या प्रवासाची सुरुवात उत्साहाने अनुभवली. शाळेत प्रार्थना, तसेच विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रेमळ वातावरणात शाळेची ओळख करून देत त्यांचा आत्मविश्वास वाढविला.

शाळेच्या व्यवस्थापनाने नवीन शैक्षणिक वर्षासाठी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कार आणि सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. राज्यभर नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात आनंददायी वातावरणात होत असून अनेक शाळांमध्ये स्वागत समारंभ आणि प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले.

या वेळी इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड परीक्षेत विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन करून उल्लेखनीय कामगिरी घडवून आणणाऱ्या शिक्षकांचा विशेष सत्कार करण्यात आला. शाळेच्या व्यवस्थापनाच्या हस्ते शिक्षकांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले.

---

# मुख्य लिपिक गोपाल आंडे यांचा सेवापुर्ती समारंभ

## सेवापूर्ती समारंभ म्हणजे निरपेक्ष कार्याचा सन्मान : जगदीश काळे

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**शेंदुरजनाघाट** – येथील जनता शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयातील मुख्य लिपिक गोपाल आंडे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार व निरोप समारंभ आयोजित करण्यात आला.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जगदीश काळे, सत्कारमुर्ती गोपाल आंडे, उज्वला आंडे, भार्गवी आंडे तर प्रमुख अतिथी म्हणुन उपाध्यक्ष अरुण काळे, सतीश सोलव, सचिव मोहन गणोरकर, सहसचिव चंद्रशेखर टाकरखेडे, संचालक अरुण फुटाणे, संचालक राजेंद्र बेलसरे, ॲड.प्रभाकर सावरकर, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी विचारपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या वतीने गोपाल आंडे यांचा सपत्नीक शाल, भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे डॉ.दिनेश खेरडे, डॉ.प्रवीण पवार, डॉ.तिलकचंद धोटे, मनीष सावरकर, संचालक ॲड. प्रभाकर सावरकर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी यांनी गोपाल आंडे यांच्या सबंध कार्यसेवेचा आढावा घेऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू मांडले. त्यांच्या कार्यकुशल, कर्तव्यनिष्ठ, बहुआयामी व कार्यतत्पर सदगुणांचा सर्वांनी भरभरून गौरव करून त्यांना निरोगी व आनंदी जीवनाच्या शुभकामना दिल्या.

कार्यक्रमाचे संचालन मराठी विभाग प्रमुख डॉ.अविनाश धोबे तर आभार गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.लुंबिनी गणवीर यांनी मानले. कार्यक्रमाला जनता शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

---

# महाराष्ट्र लुटत आहात, किमान देवाला तरी सोडा : नाशिक कुंभमेळा निविदा घोटाळ्यावरून अनिल परब यांचा सरकारवर हल्लाबोल

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – नाशिकमध्ये पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामात शासन निर्णय धाब्यावर बसवून अधिकाऱ्यांनी कंत्राटदारांची



'रिंग' तयार केली आहे. या माध्यमातून या कामांमध्ये हजारो कोटी रुपयांचा मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत तुम्ही संपूर्ण महाराष्ट्र लुटत आहात, पण किमान देवाला तरी सोडा, असा हल्लाबोल शिवसेना (ठाकरे गट) नेते अनिल परब यांनी केला.

विधान परिषदेत नियम २६० च्या प्रस्तावावर बोलताना परब यांनी पुरावे सादर करत या संपूर्ण प्रकरणाची एसआयटी चौकशी करून दोषी अधिकारी आणि कंत्राटदारांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली.

कुंभमेळ्यासाठी नाशिक जिल्ह्यासाठी २२७० कोटी रुपयांची रस्त्यांच्या निविदा काढल्या आहेत. मुख्य अभियंता प्रशांत अवटी आणि 'हर कन्स्ट्रक्शन'चे विलास बिरारी यांनी मिळून १६ कंपन्यांची 'रिंग' तयार केल्याचा आरोप परब यांनी सभागृहात केला. २०१८ च्या शासन निर्णयानुसार एखादा कंत्राटदार एका निविदेत पात्र ठरला, तर त्याला दुसऱ्या निविदेत अपात्र ठरवता येत नाही. मात्र, मर्जीतील कंत्राटदारांना कामे देण्यासाठी या अधिकाऱ्यांनी नियम धाब्यावर बसवले. तसेच या निविदा ४ टक्के वाढीव दराने दिली आहे. या निविदा प्रकियेत एकही 'ट्रिपल १' दर्जाची एकही कंपनी नसल्याकडेही परब यांनी लक्ष वेधले. निविदानंतर अजून कामे पूर्णही झालेली नाहीत, तोवर रस्त्यांना तडे गेले आहेत. यातच आणखी १३०० कोटींचे रस्त्यांसाठी निविदा काढणे बाकी असून हा भ्रष्टाचार वेळीच रोखणे गरजेचे आहे. ज्यांना रस्त्याच्या कामात संधी मिळाली नाही, त्यांना रिंग रोडच्या निविदेमध्ये संधी दिली गेली, असा आरोप परब यांनी केला. नगरसेवकांच्या निधी वाटपात दुजाभाव मुंबई मनपात सत्ताधारी नगरसेवकांच्या निधी वाटपातील दुजाभाव करत असल्याचा आरोप करत अनिल परब यांनी सरकार आणि पालिका प्रशासनावर ताशेरे ओढले.

---

## हिवरखेड जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळेत

# प्रवेशोत्सव कार्यक्रम उत्साहात साजरा



*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**हिवरखेड** – जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा हिवरखेड येथे तालुकास्तरीय शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमाला उदघाटक म्हणुन पं.स.शिक्षण विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर गायकवाड तर अध्यक्ष म्हणुन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष वैशाली दारोकार होत्या. कार्यक्रमाला सदस्य गोपाल मालपे, विषय तज्ञ बीआरसी विषय कुशकुमार पाथरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सविता सोनार, पदाधिकारी, विद्यार्थी आणि बहुसंख्य पालक उपस्थित होते. सर्वप्रथम विद्यार्थ्यांची संपुर्ण गावातून बैलगाडीमध्ये मिरवणुक काढण्यात आली. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते गणवेश व पुस्तकांचे वाटप करण्यात आले तसेच पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण सुद्धा करण्यात आले. मुख्याध्यापिका कांता माटे यांनी प्रास्ताविकातून शाळेत सुरु असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन रुबिया मिर्झा यांनी तर आभार प्रदर्शन विद्यार्थीनी कृतिका पाचारे मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता अनिता पाटील, लता लंगडे, शिक्षक मित्र नंदिनी पाचारे, मिनल शिरभाते, मंगेश बेंडे यांनी सहकार्य केले.

---

## न्यु ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटमध्ये पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे

# प्रवेशद्वारावरच सजला स्वागताचा थाट : विद्यार्थ्यांचे औक्षण

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**वरुड** – स्थानिक अग्रगण्य शिक्षण संस्था 'न्यु ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट' मध्ये नवीन शैक्षणिक सत्राचा पहिला दिवस अत्यंत प्रेमाच्या, उत्साहाच्या आणि मांगल्याच्या वातावरणात साजरा झाला. पहिल्या दिवशी शाळेत येणाऱ्या चिमुकल्यांचा शाळाप्रवेश संस्मरणीय ठरवण्यासाठी शाळेतर्फे भव्य व नयनरम्य 'प्रवेशोत्सव' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या मुख्य प्रवेशद्वाराला आकर्षक फुले आणि रंगीबेरंगी फुग्यांनी सुंदरविण्यात आले होते.





या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे मुलांचे लाडके कार्टून पात्र मिकी माऊस, छोटा भीम आणि डोरेमॉन यांची शाळा परिसरातील उपस्थिती! या पात्रांच्या पोशाखातील कलाकारांनी चिमुकल्यांचे मनोरंजन केले.

न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटमधील या आगळ्यावेगळ्या स्वागतामुळे, गाणी, नृत्य आणि कार्टून पात्रांमुळे मुलांमधील भिती आणि ताण एका क्षणात नाहीसा झाला. वर्गखोल्यांमध्ये जाताच शिक्षकांनी अभ्यासाचे ओझे न टाकता खेळ, गोष्टी आणि गप्पांच्या माध्यमातून मुलांशी मैत्रीपूर्ण संवाद साधला.

या सुवर्णप्रसंगी मुख्याध्यापिका माधुरी भोंडे यांनी सर्व विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. 'केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे, त्यांच्यातील कलागुणांना वाव देणे आणि त्यांच्यावर उत्तम संस्कार करून त्यांना देशाचे जबाबदार नागरिक बनवणे, हेच आमच्या शाळेचे ब्रीद आहे' असे प्रतिपादन त्यांनी केले.

या संपूर्ण प्रवेश–त्सव सोहळ्याला मुख्याध्यापिका माधुरी भोंडे, समन्वयक श्वेता गणोरकर, पी.आर.ओ.किशोर देशमुख, प्रि.प्रायमरी.विभाग प्रमुख पराग भोंडे यांचे मार्गदर्शन प्राप्त झाले.

शाळेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधने , उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, कोषाध्यक्ष डॉ.वेदांत राजोरिया, सचिव अनिल गुल्हाने, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, सहसचिव शाम खंडेलवाल, सदस्य विनय यावलकर आदी सर्व मान्यवरांनी या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे कौतुक करून नवीन शैक्षणिक वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्यात.

# संपादकीय

**काहीतरी मिळवण्या साठी विचारपूर्वक धोका पत्करावे लागते.**

## पॅलेस्टाईनचा नरसंहार: ज्यूंचा इतिहास आणि वर्तमानातील क्रूर विडंबन

इतिहास हा माणसाला शहाणपण शिकवण्यासाठी असतो, असे म्हटले जाते. मात्र, जागतिक राजकारणाच्या पटावर जेव्हा आपण इस्रायल आणि पॅलेस्टाईन संघर्षाकडे पाहतो, तेव्हा इतिहास स्वतःची क्रूर पुनरावृत्ती करताना दिसतो. ज्या ज्यू समाजाने शतकानुशतके अनन्वित छळ सोसला, ज्यांनी मानवतेच्या इतिहासातील सर्वात मोठा कलंक असलेला 'होलोकॉस्ट' (ज्यू नरसंहार) अनुभवला, आज त्याच ज्यूंचे प्रतिनिधित्व करणारा इस्रायल देश पॅलेस्टिनी जनतेच्या रक्ताने आपले हात माखत आहे. एका छळलेल्या समाजानेच दुसऱ्या निष्पाप समाजाला छळण्याचे केंद्र बनावे, यासारखी दुसरी जागतिक शोकांतिका नाही. हा संघर्ष केवळ दोन देशांतील भूमीचा वाद राहिलेला नाही, तर तो मानवी संवेदना, आंतरराष्ट्रीय कायदा आणि नैतिकतेचा पूर्णपणे झालेला संकोच आहे. ज्यूंचा वेदनेचा इतिहास आणि जगाची सहानुभूती ज्यू लोकांचा इतिहास हा विस्थापन, अत्याचार आणि वेदनांनी भरलेला आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जर्मनीमध्ये अ?डॉल्फ हिटलरच्या नाझी राजवटीने ज्यूंचा पद्धतशीरपणे छळ केला. 'कॉन्सन्ट्रेशन कॅम्प्स' (यातना छावण्या), गॅस चेंबर्स आणि गोळ्या घालून तब्बल ६० लाख ज्यूंची निर्घृण हत्या करण्यात आली. लहान मुले, महिला, वृद्ध कुणालाही सोडले गेले नाही. हा मानवी इतिहासातील असा एक काळा अध्याय आहे, ज्याच्या आठवणीने आजही जगाच्या अंगावर काटा येतो. या भयानक नरसंहारातून जे ज्यू वाचले, त्यांच्याबद्दल संपूर्ण जगाला प्रचंड सहानुभूती होती. त्यांनी भोगलेल्या यातनांमुळेच जगाने त्यांच्यासाठी एक स्वतंत्र मायभूमी (होमलँड) असावी ही मागणी मान्य केली आणि १९४८ मध्ये 'इस्रायल' या देशाची निर्मिती झाली. जगाला वाटले होते की, ज्या समाजाने छळ आणि विस्थापनाचे दुःख एवढ्या जवळून पाहिले आहे, तो समाज जगात शांतता, न्याय आणि सहअस्तित्वाचा सर्वात मोठा पुरस्कर्ता बनेल. परंतु, दुर्दैवाने तसे झाले नाही. छळणारे बदलले, पण छळायची पद्धत तीच! आज इस्रायल पॅलेस्टिनी जनतेसोबत जे करत आहे, ते पाहिल्यावर 'यातना भोगलेले लोकच जेव्हा इतरांना यातना देतात, तेव्हा ते भूतकाळातील आपल्याच वेदना विसरतात का?' असा गंभीर प्रश्न पडतो. गाझा पट्टी आणि वेस्ट बँक या भागांमध्ये पॅलेस्टिनी जनतेला त्यांच्याच मायभूमीत कैद्यांसारखे जगण्यास भाग पाडले गेले आहे. गेल्या काही काळातील इस्रायली हल्ल्यांनी क्रूरतेच्या सर्व सीमा ओलांडल्या आहेत. गाझावर होणारा बॉम्बवर्षाव, रुग्णालये, शाळा, शरणार्थी छावण्यांवर होणारे हल्ले आणि हजारो निष्पाप मुलांचा

# कनकन्कुद्री तुनतुन्तारी टप्डाटुप्डा: घोड्याच्या प्रतीकातून उमललेला मानवी आलेख

विलास पाटील हे मराठी साहित्यातील एक दिलखुलास, स्वच्छंदी, कवी, लेखक, टीका आणि नाटककार आहेत. त्यांचे 'दुष्काचा आलेख', 'भंग्ल्याले आभंग' हे काव्यसंग्रह, 'कातड्याच्या परीक्षानळ्य', 'भारत माझा देश' या एकांकिका व संग्रह तर 'कृष्णराव पांडुरंग भालेकर'(चरित्र), 'अस्टंगः फमुंची कविता'(टीकाग्रंथ), 'भटके लोक' (ललित लेख), 'तथागत गौतम बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर' हे लेखसंग्रह आहेत.

यानंतर इ.स.१९८० ते २०२४ एवढ्या तब्बल ४४ वर्षांच्या प्रगल्भ चिंतनातून, मानवी उत्पत्तीपासून ते आजच्या प्रगतीपर्यंतचा आलेख घोड्याच्या प्रतीकातून उमललेले १०८ टापांचे प्रदीर्घ देशीवादी लोकभाषेचे लेणे म्हणजे 'कनकन्कुद्री तुनतुन्तारी टप्डाटुप्डा' हा कविता संग्रह होय. 'कुद्री' म्हणजे 'घोडा' या अडीच अक्षरी शब्दाची पुढे १०८ टापांची कविता ५४ + ५४ अशा दोन विभागात विभागलेली आहे. विशेषतः मध्ये 'अिसावा' हा शब्द मानवी जीवनात मृतदेहाला स्मशनाकडे नेताना, वाटेत विसावा देणे या विधीसाठी वापरला जातो.


कवीला यामधून आपण घोड्याच्या अंत्ययात्रेत सामील आहोत, यातून मानवी गती-प्रगतीचा शेवट तर सुचवायचा असेल का? हा प्रश्न पडतो. यामुळे ही कविता ; कवी केशवसूत, मर्ढेकर, अरुण कोलटकर, दि.पु.चित्रे, विलास सारंग, नामदेव ढसाळ यांच्याप्रमाणे २१ व्या शतकातील मराठी नवसाहित्यातील नवप्रयोगशील कवितेचं उत्तम उदाहरण ठरते! असे म्हणता येईल. कवितेचा नवा आशय, आकृतीबंद, शैली व मुक्तछंद घेऊन आलेली ही लांबलचक कविता वाचक व समीक्षक यांना प्रथमतः दुर्बोध वाटते परंतु एकदा आशय आणि विषय कळला की, हृदयाचा ठाव घेऊन लोकभाव व्यक्त करणारी भावगंगा निर्माण होते. नव्हे तर ती संत ज्ञानेश्वरांच्या हस्ती घोडे हरण सिंहाडे तैसे है गुजराती लुगडे गे माये या अभंग रचनेप्रमाणे आपल्याच समग्र जीवनाचे लोकसंगीत होते.

कवी आपल्या घरची घोडी दुष्काळात मरण पावली, यामुळे अस्वस्थ होतो. याचा त्याच्या बालमनावर आघात होऊन याविषयी ते आठ वर्षानंतर या कवितेचे सुरूवातीला तीन कडवे लिहितात. कवितेचं हे बीज काळाच्या ओघात पुढे घोडा या विषयावर सलग ४४ वर्षाच्या चिंतनातून, हे मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान; प्रदीर्घ प्रयोगशील काव्यातून उलगडत जाते. 'घोडा' आणि 'माणुस' हे प्रतीक असलेली कविता संपूर्ण मानवी जीवनाच्या उत्क्रांतीचा टप्पा कवीला जसा दिसला, भावला तसाच अस्सल बोली रुपात अक्षरबद्ध झाला आहे.

त्यासाठी कवीने कुठलाही भाषिक अट्टाहास न करता काव्यपरंपरेचे रचना, छंद, आकृतीबंध, वृत्ते इत्यादी विषयीचे संकेत झुगारुन आशयानरुप विविध प्रयोग केले आहेत. मानवी जीवनात १०८ या अंकाला असलेले आध्यात्मिक, सांस्कृतिक व वैज्ञानिक महत्त्व या प्रायोगिक कवितेतून अभिव्यक्त होते. त्याचबरोबर 'घोडा' आणि 'मानवी'जीवन यांच्या सह प्रवासाच्या अनंतछटा प्रस्तुत संग्रहातून दिसून येतात. 'कनकन्कुद्री तुनतुन्तारी टप्डाटुप्डा' हे शीर्षकच परंपरेला छेद देणारं. संग्रहाच्या नावातही लयबद्धता, पण अर्थापेक्षा ध्वनी, लय आणि तालाला महत्त्व असलेले दिसून येते. मानवी उत्पत्ती पासून ते आजच्या प्रगतीकारक अवस्थेचे व व्यवस्थेचे 'घोडा' या अनेक अर्थी व वाचताना दरवेळी वेगवेगळ्या प्रतीकाचे रूप घेऊन येणाऱ्या शब्दातून कवी समग्र लोकजीवनाचे चित्रण करतो आहे. याचा प्रत्यय येऊन वाचक स्तिमित होतो.

विलास पाटील यांनी या कवितेत पारंपरिक अलंकार, यमक, वृत्त, छंद यांचे बंधन पूर्णपणे नाकारले आहे. मुक्तछंद आणि गद्य-काव्याच्या सरमिसळीतून निर्माण झालेली ही अद्भुत रचना समग्र मराठी कवितेच्या इतिहासातील आगळीवेगळी आणि लक्षवेधी ठरणारी आहे. तुनतुन्तारी टप्डाटुप्डा हा ध्वनीच रचनाबंध बनला आहे. कवितेच्या ओळी सरळ नाहीत. तिरक्या, वेडयावाकडया, ठिपक्यांच्या रचल्या आहेत. पानावर रांगोळी काढल्यासारख्या दिसतात. हे दृश्यकाव्य व्हिजुअल पोयेट्रीच आहे.

हा संग्रह ग्रंथाची मराठी नाकारतो




आणि लोकांच्या ओठांवरची मराठी 'अस्सल बोलीभाषा' अर्थात लोकभाषेतील शब्दशैली स्वीकारतो. ध्वनी-प्रतीकं, म्हणी, कोडी यांचा वापर. 'कन्कनकुद्री' सारखे अनोखे नादमय शब्दप्रयोग. शहरी-शिष्ट आशयाऐवजी ग्रामीण/गावरान, रांगड्या जीवनाचा वेध घेणारी ही कविता मराठवाड्यातील परभणी, जिंतूर, लातूर, उदगीर, औराद-शहाजानी, माळेगावची जत्रा आणि सीमाभाग या प्रदेशातील अस्सल देशी भाषा. उदा.वाकळ, बुबळ, फुडं, पल्डं, जुंदळा, सज्गुरा, बोंबी, आवस, अेक्टा, अेकदा, बारीक, बरप, अुजेड, अुतरंड, अिसावा, ढव्ळा, नुस्ता, धुराळ्ा, अुडवत, मोर्की, व्हटाळी, बिमार्पल्डा, घिस्डी, मुड्दंग, खोगर्मिट्टी, पुन्वंला, अलफ इत्यादी. याशिवाय यामध्ये हिंदी, इंग्रजी, पाली, उर्दू, अरबी, दखनी, कानडी, गोरमाटी इत्यादी भाषेतील शब्दांमधून अस्सल देशी लोकबंध व्यक्त होतो.

मानूस झाला घो लाग्ला झायराती पाटी यामधून आजचे राजकीय-सामाजिक जीवन चित्रण येताना दिसून येते . पूर्वीच्या काळी लग्न-वरात, जत्रा-यात्रांमधील मिरवणुक प्रसंगी भलेची भलकरी म्हणत...अशी गाणी असत. अशा स्वरुपाचाही समर्थ प्रयोग या कवितेत कवीने केला आहे. उदा. मा- असं ना तसं पंडू कोळ्ॅनं मार्लय ससं घो - भले बोल्की भलेऽ डंगडंग डंग.

नादमय शब्दरचना टप टप टप टप, छूळ खूळ छूळ खूळ छूळ खूळ, डँग डँग डँग, चॅकचॅक डडनंग, चॅकचॅक....अशा विविध लोकध्वनी प्रकारांना कवेत घेणारी कविता कधी कथा, चित्र, लोककथा, लोकगीत, लोकनाट्य, म्हणी, बोली यांना कवेत घेत अभिव्यक्त होत जाते.

मराठीतील वर्णमाला कवीला मान्य नसल्यामुळे अक्षरे व शब्द रचनेत बदल केलेला दिसून येतो. उदा. इ, ई, उ, ऊ ऐवजी अनुक्रमे अ, अी, अु, अू तर कवितेची सुरुवात 'अलफ' या अरबी शब्दाने केली असून कवितेच्या शेवटी 'फलअ' असा शब्द वापरुन घोड्याने कृतीतून स्वागत केले असे दृश्य निर्माण केले गेले आहे तसेच 'माणुस' हा शब्द 'सनुमा'असा उलटा तर, 'अळवक' हा शब्द 'घोडा' मिथक या अर्थाने वापरला आहे. काही टापा अल्पाक्षरी, एका ओळीच्या असल्या तरी त्या अर्थपूर्ण व अर्थगर्भ आहेत. उदा. मानूस झाला निलाज्रा लाजते यंतर्घोडी, घोडा रड्तो आव्संला अंदारा अेक्टा अेक्टा या एक ओळीच्या, काही दोन ओळीच्या तर एक अक्षराचीच एक ओळ - अशा कविता आपणाला वाचावयास मिळतात.

विलास पाटील यांनी कवितेला 'अभिजात' कोंडीतून बाहेर काढून 'जमिनी'वर आणलं. केशवसुतांनी सुरू केलेली परंपरा मोडित, मर्ढेकर-ढसाळ-तुळसी परब, मनोहर ओक यांनी पुढे नेली तीच वाट पाटलांनी अधिक रांगडी, ध्वनिप्रधान आणि अस्सल देशी केली.

थोडक्यात हा संग्रह नवकवितेतील नवे वळण आहे. परंपरागत भाषाशास्त्र व सौंदर्यशास्त्र यांचे नियम मोडून अनुभवाचं, जगण्याचं, बंडाचं स्वतंत्रशास्त्र उभं करतो म्हणुन विलास पाटील हे खऱ्या अर्थाने प्रयोगशील कवी ठरतात. पाटील यांनी हा एका कवितेचा संग्रह एका रात्रीत लिहिलेला नसून, तो ४२ वर्षांच्या प्रदीर्घ चिंतन- अनुभव आणि निरीक्षणातून तत्त्वज्ञानाच्या अंगाने हा संग्रह साकारला आहे. त्यामुळे यातले प्रत्येक अक्षर - शब्द -ओळ विचारांची खोली घेऊन येते. हा झटपट, अल्पाक्षरी कविताप्रकार नाही, तर ते मानवी जीवनाचा अर्क- सार आहे.

विलास पाटील यांचा संग्रह १०८ टापांची रांगोळी आहे. यात व्याकरण नाकारुन बोली, मिथक, चित्रमयता व वैयक्तिक स्मृती यांमधून मानवी घोडा वैश्विक केला आहे. त्यामुळे ही कविता मराठीत मैलाचा दगड ठरावी, अशी आहे, असे म्हटले तर अतिशोयक्ती ठरणार नाही म्हणून हा संग्रह मराठीभाषेला तिच्या अभिजात स्वरुपाकडे नेणारा रूपबंधात्मक ऐवज आहे. यातील एक जरी अक्षर ओढून काढले तर समग्र कवितेची इमारत ढासळून पडते, इतकी चिरेबंद बांधणी असलेला कविता संग्रह २१ व्या शतकाच्या रौप्यमहोत्सवी वर्षात कवितेच्या सुजाण वाचकांच्या हाती आला आहे. योग्य ठिकाणी सुरू होऊन योग्य ठिकाणीच संपणारी ही कविता मराठी कवितेच्या इतिहासालाच वेगळे वळण देणारी दखलपात्र कविता आहे.


-: समीक्षक :-



डॉ.चत्रभूज कदम
महात्मा फुले महाविद्यालय,
वरुड, जि.अमरावती
मोबा.९४२१३४४०१३


# भारताची स्थिर आणि भक्कम वाटचाल

गोल्डमन सॅक्स संस्थेने भारताच्या आर्थिक वाढीचा अंदाज वाढवला असून कॅलेंडर वर्ष २०२६ साठी भारताचा जीडीपी वाढीचा अंदाज ६.८% इतका करण्यात आला आहे. आर्थिक वर्ष २०२७ साठी तो ६.५% असा सुधारित केला आहे. आधीच्या अपेक्षेपेक्षा हे अंदाज जास्त आहेत.




फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस झालेल्या हल्ल्यांमुळे होर्मुझ सामुद्रधुनीचा मार्ग जलवाहतुकीसाठी बंद करण्यात आला- ज्या सामुद्रधुनीतून जगातील जवळपास एक पंचमांश तेल आणि भारताचे बहुतांश कच्चे तेल आणि स्वयंपाकाच्या गॅसची वाहतूक केली जाते- तेव्हा बहुतेक भारतासमोर मोठे संकट उभे राहील असे जवळपास निश्चित मानले जात होते. कच्च्या तेलाच्या एकूण गरजेपैकी सुमारे नऊ दशांश आणि निम्म्याहून अधिक स्वयंपाकाचा गॅस आखाती मार्गातून आयात करणारा भारत, त्याची अवस्था पाहता पेट्रोल पंपांवर लांबच लांब रांगा, रिकामी स्वयंपाकघरे, रुपयाचे अवमूल्यन आणि परकीय चलन मिळवण्यासाठीची धडपड अशीच होईल, असे काहीसे चित्र दिसत होते.

मात्र सुमारे चार महिने उलटून गेले असताना आणि होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा एकदा वाहतुकीसाठी खुली होत असताना तसेच कच्च्या तेलाच्या किमती संकटपूर्व पातळीवर परत येत असताना, या संपूर्ण काळात जशी भीती व्यक्त होत होती त्यापैकी काहीच घडले नव्हते. एकही पेट्रोल पंप इंधनाविना राहिला नाही. ज्या कुटुंबांना सिलिंडर हवा होता, त्यांना तो उपलब्ध झाला. भारताला १९९१ च्या काळातील किंवा २०१३ मधील परिस्थितीला तोंड द्यावे लागले नाही. देशाची व्यापक आर्थिक स्थिरता संपूर्ण काळात कायम राहिली.

हे काही अचानक घडले नाही किंवा यामागे नशिबाचाही भाग नव्हता. यामागे केंद्र सरकारची अतिशय विचारपूर्वक आणि नियोजनबद्ध कृती होती, सरकारने महामारीच्या काळात ज्याप्रकारे टप्प्याटप्प्याने, जाणीवपूर्वक परिस्थिती हाताळली त्याप्रमाणे एकाच मोठ्या आणि नाट्यमय उपायावर अवलंबून न राहता योजनांची मालिका एकापाठोपाठ राबवली गेली.

पहिले प्राधान्य अर्थात कुटुंबांना दिले गेले. या संपूर्ण काळात एकाही किरकोळ विक्री केंद्रात इंधनाचा तुटवडा भासला नाही आणि प्रत्येक स्वयंपाकघरात सिलिंडर उपलब्ध झाला. १४.२ किलोच्या सिलिंडरच्या आयातीवर आधारित किंमत एक हजार ६०० च्या वर पोहोचून देखील घरगुती ग्राहकांसाठी त्याची किंमत ९०० रुपयेच स्थिर राहिली, तर सर्वात गरीब कुटुंबांसाठी ती त्याहूनही कमी होती. घरगुती ग्राहकांचा गॅस पुरवठा अबाधित राहावा यासाठी व्यावसायिक आणि मोठ्या प्रमाणावर एलपीजी वापरणाऱ्या ग्राहकांना काही प्रमाणात मागे राहण्याची विनंती करण्यात आली.

व्यापक अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या इंधनाच्या आघाडीवर केंद्र सरकारने वाढीव दराचा भार ग्राहकांवर न टाकता स्वतः उचलण्याचा निर्णय घेतला. सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात प्रतिलिटर दहा रुपयांची कपात करून सुमारे १.७ लाख कोटी रुपयांच्या महसुलावर पाणी सोडले आणि हवाई इंधनावरील ताण कमी केला. यामागील तर्कसंगत विचार सांगायचा झाला तर, अशा अनिश्चिततेच्या काळात केवळ केंद्र सरकारकडे जोखीम पेलण्याची आर्थिक क्षमता आणि दीर्घकालीन दृष्टी असते. विमान कंपन्यांना विशेष आर्थिक सहाय्य देण्यात आले.

किमती स्थिर ठेवण्यामागे पुरवठा साखळीचे प्रभावी संरक्षणही होते. देशांतर्गत तेलशुद्धीकरण कंपन्यांनी अवघ्या एका आठवड्यात स्वयंपाकाच्या गॅसचे उत्पादन निम्म्याने वाढवले आणि आयात ठप्प झाल्याने निर्माण झालेली तूट मोठ्या प्रमाणात भरून काढता आली. भारताने अत्यंत जलदगतीने आपल्या स्रोतांचा आवाका वाढवला, अमेरिका आणि रशियासह नवीन पुरवठादारांकडून इंधन खरेदी सुरू झाल्याने सामुद्रधुनीवर अवलंबून असलेली ऊर्जा आयात लक्षणीय प्रमाणात कमी करण्यात भारताला यश आले.

रशियन कच्च्या तेलाची खरेदी सुरू ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या सवलती मिळिवण्यातही भारत यशस्वी ठरला. केंद्र सरकारने दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीनेही उपाययोजना सुरू ठेवल्या. पंतप्रधानांच्या संयुक्त अरब अमिराती दौऱ्यादरम्यान भारतासाठी धोरणात्मक कच्चे तेल साठे उभारण्याबाबत महत्त्वाचा करार करण्यात आला. हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतील जहाज वाहतूक अत्यंत मर्यादित झाली असतानाही, भारत हा आपल्या तेलवाहू जहाजांची वाहतूक अखंडित सुरू ठेवणाऱ्या मोजक्या देशांपैकी एक ठरला.

देशाच्या बाह्य आर्थिक व्यवहारांचे व्यवस्थापनही सरकारने संयमाने आणि दूरदृष्टीने केले. परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी सरकारी रोख्यांमध्ये केलेल्या गुंतवणुकीवरील रोख कर आणि भांडवली नफा कर हटवण्यात आले. पूर्णपणे सुलभ मार्गांतर्गत उपलब्ध असलेल्या सरकारी रोख्यांची व्याप्ती वाढवण्यात आली. नव्याने सुरू करण्यात आलेल्या अनिवासी डॉलर ठेव योजनेमुळे परकीय चलन मोठ्या प्रमाणावर येण्याची शक्यता आहे. गेल्या काही वर्षांमध्ये केलेल्या मुक्त व्यापार करारांनी चोख कार्य केले त्याचा सकारात्मक परिणाम दिसत आहे. एप्रिल आणि मे २०२६ या कालावधीत, तेल तसेच रत्ने आणि दागिने वगळता इतर वस्तूंची निर्यात आणि सेवा निर्यात, मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत १२ टक्क्यांहून अधिक वाढली.

गेल्या आर्थिक वर्षात एकूण थेट परकीय गुंतवणूक ९५ अब्ज डॉलरवर पोहोचली असून, तिने महामारीनंतरच्या वर्षातील ७० ते ८० अब्ज डॉलरचा टप्पा ओलांडला आहे. आर्थिक वर्ष २०२६ मध्ये चालू खात्यातील तूट जीडीपीच्या केवळ ०.६ टक्के होती आणि आता आर्थिक वर्ष २०२७ मध्ये ती किंचितच जास्त असण्याची अपेक्षा आहे. निष्पक्षपणे पाहिले तर, या यशामध्ये नशिबाचाही काही प्रमाणात वाटा होता, हे मान्य करणे आवश्यक आहे. मात्र मे महिन्यापासून चीनकडून होणाऱ्या तेल खरेदीत घट झाली आणि अमेरिकेच्या धोरणात्मक साठ्यातून नियमितपणे करण्यात आलेल्या तेलाच्या रिलीजमुळे जागतिक बाजारातील ताण कमी झाला.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# लासलगावची कांदा बाजारपेठ विस्तारणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**लासलगाव** – आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी मध्य रेल्वेने मालवाहतूक अधिक गतिमान आणि वेळेत करण्याच्या दृष्टीने ९५ गुड्स शेड्सचे नवीन वार्षिक वर्गीकरण जाहीर केले आहे. यामध्ये लासलगावसह ११ गुड्स शेड्सना उच्च श्रेणीत पदोन्नती मिळाली असून यामुळे रेल्वेच्या मालवाहतूक व्यवस्थेला नवी गती मिळणार आहे. पण त्याचबरोबर लालसगाव कांदा बाजारपेठ अधिक मजबूत होणार असून त्यामुळे एक प्रकारे तिचा



विस्तारच होणार आहे. दरम्यान, नवीन वर्गीकरण १ जुलैपासून लागू करण्यात आले आहे. रेल्वेकडून दरवर्षी माल हाताळणीची क्षमता, कामकाजाची कार्यक्षमता आणि उपलब्ध सुविधांच्या आधारे गुड्स शेड्सचे वर्गीकरण केले जाते. यंदा ९५ गुड्स शेड्सपैकी ४२ गट-१, १२ गट-२ आणि ४१ गट-३ मध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. या व्यवस्थेमुळे मालगाड्यांच्या वॅगनचा अनावश्यक थांबा कमी होऊन रेल्वेच्या पायाभूत सुविधांचा अधिक परिणामकारक वापर होणार आहे.

# धरण क्षेत्रात पावसाची संथगती : पाणीसाठा ९ टक्क्यांवर, मुंबईकरांना किंचित दिलासा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मुंबई, ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्याला पावसाने झोडपून काढले असले तरी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही धरण क्षेत्रात मात्र पावसाचा जोर कमीच आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठ्यात संथगतीने वाढ होत आहे. ३ जुलै रोजी सातही धरणातील पाणीसाठा ८.९३ टक्क्यांवर पोहोचला आहे. त्यामुळे मुंबईकरांना किंचित दिलासा मिळाला आहे. दरम्यान, पुढील काही दिवसांत



धरण क्षेत्रातही पावसाची जोरदार हजेरी लागेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

मोडकसागर, भातसा, अप्पर वैतरणा, मध्य वैतरणा, विहार, तुळशी व तानसा या सात धरणांतून मुंबईकरांची तहान भागवण्यासाठी रोज ४,१०० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करण्यात येतो, तर वर्षभराची तहान भागवण्यासाठी धरणांत १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लिटर पाणीसाठ्याची गरज भासते. सध्या सातही धरणांत ३ जुलै रोजी १ लाख २९ हजार ३०८ दशलक्ष लिटर पाणीसाठा उपलब्ध आहे.

धरणातील पाणीसाठ्यात घट झाल्याने १५ मेपासून १० टक्के पाणीकपात लागू करण्यात आली आहे. धरण क्षेत्रात पावसाने पाठ फिरवल्याने पाणीकपातीत आणखी वाढ करण्याची तयारी पालिका प्रशासनाने सुरू केली होती. मात्र, गेल्या आठवडाभरापासून धरण क्षेत्रात पावसाची संथगतीने रिपरिप सुरू असल्याने पाण्याच्या पातळीत हळुवार वाढ होत आहे.

दरम्यान, पाणीसाठ्यात वाढ होत असली तरी तो अद्याप समाधानकारक पातळीपासून दूर असल्याने मुंबई महापालिकेने सावध भूमिका घेतली आहे.

जरुडच्या उत्क्रांती नागरी सहकारी पतसंस्थेचे वतीने

# ‘सहकार सप्ताह’ अंतर्गत वृक्षारोपण व परिसंवाद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – महाराष्ट्र शासनाच्या निर्देशनानुसार २९ जुन ते ६ जुलै २०२६ दरम्यान जरुडच्या उत्क्रांती नागरी सहकारी पतसंस्थेचे वतीने नुकतेच ‘सहकार सप्ताहा’ चे मातोश्री कौसल्याबाई वानखडे सभागृहात आयोजित करण्यात आले होते. या वेळी वृक्षारोपण व परिसंवादाचे आयोजन देखील करण्यात आले होते. वरूड तालुक्यातील नागरी व कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या संघाचे




अध्यक्ष तथा उत्क्रांती नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष रामराव वानखडे यांचे अध्यक्षतेखाली सदर कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी सहाय्यक निबंधक डॉ.आशिष चर्जन यांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी उत्क्रांती सहकारी संस्था सामाजिक कार्यात अग्रेसर असल्याचे मत व्यक्त केले. पतसंस्थेच्या संघाचे संचालक प्रमोद गणोरकर, उत्क्रांतीचे माजी प्राचार्य अशोक पाटील, रविंद्र वसुले यांची सहकार विषयीं भाषणे झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.अशोक खोपे, संचालन सी.टी.पठाण यांनी तर आभार सरव्यवस्थापक राजीव शेलकर यांनी मानले. कार्यक्रममाचे यशस्वितेकरिता श्रीकांत गावंडे , पंकज लेकुरवाळे, श्रीकांत कानडे, हर्षल डखरे, निलेश नेरकर, योगेश तडस, ओम नेरकर, गीतेश कडे, सुनील राऊत, अमोल कडू आदींनी सहकारी केले.

जागृत इंग्लिश प्रायमरी व जागृत कॉन्व्हेंटचा

# विद्यार्थी प्रवेशोत्सव आनंदात उत्साहात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – जागृत नवयुवक शिक्षण संस्था द्वारा संचालित जागृत इंग्लिश प्रायमरी व जागृत कॉन्व्हेंटचा प्रवेशोत्सव आनंदात उत्साहात साजरा करण्यात आला.

त्यावेळी नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी जागृत आवारात विद्यार्थ्यांचा किलबिलाट सुरु झाला. शाळेचा पहिला दिवस अविस्मरणीय करण्यासाठी संपूर्ण शाळा रंगबिरंगी फुगे, तोरण आणि आकर्षक रांगोळ्यांनी सजविण्यात आली होती.

शाळा सुरू होताच शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गुलाब




पुष्प देवुन, कुंकूम तिलक लावुन व चॉकलेट देऊन अतिशय उत्साहात स्वागत केले. पहिल्या दिवशीची आठवण म्हणुन शाळेत खास माझा पहिला दिवस अशा सेल्फी पॉईंट तयार करण्यात आला होता, जिथे विद्यार्थ्यांनी शिक्षक व पालकांसोबत फोटो काढले.

शाळेची सुरुवात परिपाठ अर्थातच राष्ट्रगीताने करण्यात आली.

मुख्याध्यापिका पूजा मांडवगडे व पर्यवेक्षिका उज्वला लाडोळे यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. शाळेच्या पहिला दिवस हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

विशेषतः नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी आपुलकी व आनंददायी वातावरण निर्माण केले. विद्यार्थ्यांवर अभ्यासाचे ओझे न टाकता शिक्षकांनी अतिशय खेळकर वातावरणात तयार केले होते. अशा या प्रवेशोत्सव प्रसंगी जागृत नवयुवक शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापिका पूजा मांडवगडे, पर्यवेक्षिका उज्वला लाडोळे, सर्व शिक्षक, शिक्षिका तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाकरिता शुभेच्छा दिल्या.

# स्मार्ट मीटर बसवणे कायद्याने बंधनकारक : मेघना बोर्डीकर यांची स्पष्टोक्ती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – विद्युत अधिनियम २००३ आणि केंद्रीय विद्युत प्राधिकरण मीटर विनिनियम २००६ नुसार सर्व वीज कंपन्यांना स्मार्ट मीटर बसवणे बंधनकारक



आहे. मात्र, प्रीपेड मीटर ऐच्छिक आहे, अशी स्पष्टोक्ती ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी शुक्रवारी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली. राज्यात १ कोटी २३ लाख स्मार्ट मीटर बसवले असून त्यापैकी केवळ ३ लाख ९२ हजार ग्राहकांच्या तक्रारी आल्या आहेत. ज्या मीटरच्या संदर्भात तक्रारी येतात त्यांचे तत्काळ निवारण केले जात असल्याचे सांगत बोर्डीकर यांनी स्मार्ट मीटरबाबत विनाकारण गैरसमज न पसरविण्याचे आवाहन आमदारांना केले. भाजपच्या भीमराव तापकीर यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली होती. दोन्ही बाजूच्या सदस्यांनी स्मार्ट मीटरबाबत तक्रारी केल्या. या मीटरमुळे वीज बिल जास्त येते. या मीटरमुळे ग्राहकांमध्ये रोष आहे, याकडे आमदारांनी सरकारचे लक्ष वेधले. स्मार्ट मीटरमुळे वीज बिलात तिपटीने वाढ झाली आहे. तसेच कोणता मीटर लावायचा याचा निर्णय घेण्याचा अधिकार ग्राहकांना असेल का? असे प्रश्न राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या चेतन तुपे यांनी केले.

# कारवाईचा बडगा, १२ अधिकारी तडकाफडकी निलंबित

नादुरुस्त एसटी बस १५ दिवस पडून, लाखोंचे नुकसान

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - नव्याने ताफ्यात दाखल झालेली एक एसटी बस तांत्रिक बिघाडामुळे १५ दिवस कार्यशाळेत पडून राहिल्याने झालेल्या नुकसानीला जबाबदार धरून नाशिक विभागातील प्रादेशिक अभियंता, यांत्रिक अभियंता आणि विभाग नियंत्रकांसह एकूण १२ अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे.

ऐन गर्दीच्या हंगामात ही बस सेवेबाहेर राहिल्याने महामंडळाचे ३ लाखांहून अधिक रुपयांचे नुकसान झाले. या निष्काळजीपणाची गंभीर दखल घेत एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांनी ही कारवाई केली.



महामंडळाच्या महाव्यवस्थापकांनी केलेल्या अचानक तपासणीत हा गंभीर प्रकार उघडकीस आला. या बसमध्ये केवळ किरकोळ तांत्रिक बिघाड झाला होता.

मात्र, संबंधित अधिकाऱ्यांनी वेळेत सुटे भाग उपलब्ध करून दिले नाहीत किंवा दुरुस्तीच्या कामाकडे लक्ष दिले नाही. प्रवाशांची मोठी मागणी असतानाही ही बस १५ दिवस कार्यशाळेतच पडून होती, ज्यामुळे महामंडळाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आणि प्रवाशांचीही गैरसोय झाली.


## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील
व्ही.व्ही.राजुरकर साहेब, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश
( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५६१/२०२६** **ने.ता.३०/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) मधुसुदन मोतीरामजी बंदे, वय अं.७१ वर्ष, धंदा- मजुरी, रा.रिंग रोड दत्त मंदिराजवळ, वरुड, २) सुनिल मोतीरामजी बंदे, वय अं.६४ वर्ष, धंदा- मजुरी, रा.रिंग रोड शिवनगर, वरुड, ३) गणेश मोतीरामजी बंदे, वय अं.६२ वर्ष, धंदा- शेती, रा.शांकुतल विहार, वरुड, ४) चंद्रकांत मोतीरामजी बंदे, वय अं.५९ वर्ष, धंदा- शेती, रा.सावता चौक, वरुड, ५) लोकेश पदमाकर बंदे, वय अं.३६ वर्ष, धंदा- मजुरी, ६) शुभम पदमाकर बंदे, वय अं.३१ वर्ष, धंदा- मजुरी, दोघे रा.वार्ड क्र.१९ भवानी चौक, व्दारा मधुकर रामकृष्णजी सुपले, वरुड, ता.वरुड

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत मोतीराम गणपतराव बंदे व मयत शांताबाई मोतीरामजी बंदे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **३०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील
श्रीमती.आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश
( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५६०/२०२६** **ने.ता.०३/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) लोकेश पदमाकर बंदे, वय अं.३६ वर्ष, धंदा-मजुरी

२) शुभम पदमाकर बंदे, वय अं.३१ वर्ष, धंदा- मजुरी

दोघे रा.वार्ड क्र.१९ भवानी चौक, व्दारा मधुकर रामकृष्णजी सुपले, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत पदमाकर मोतीरामजी बंदे व मयत संध्या पदमाकर बंदे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०३/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **३०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील
श्री.एम.डी.सैंदाणे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )
वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५६२/२०२६** **ने.ता.३०/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) सौ.संगिता शरद जयस्वाल, वय अं.५५ वर्ष, धंदा-गृहीणी, रा.अमरावती, ता.जि.अमरावती, २) सौ.पदमा राजेश जयस्वाल, वय अं.५३ वर्ष, धंदा- व्यवसाय, रा.गोविंद विहार कॉलनी, वरुड, ३) श्रीमती सुनिता संजय जयस्वाल, वय अं.५९ वर्ष, धंदा- व्यवसाय, रा.केदार चौक वरुड, ४) सौ.नयना महेश गोरवाल, वय अं.३८ वर्ष, धंदा- गृहीणी, (पुर्वीचे नाव नयना धिरज जैस्वाल) रा.लाखिरा, ता.इंदरगढ, जि.बुंदी, ५) सौ.पल्लवी आशिष जैस्वाल (जयस्वाल), वय अं.३६ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.ए.९,त्रीदल अर्पाटमेंट, औरंगाबाद, (संभाजीनगर), ६) आकाश संजय उर्फ संजयलालजी जैस्वाल (जयस्वाल), वय अं.३३ वर्ष, धंदा- व्यवसाय, रा.केदार चौक वरुड

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत सिताबाई शंकरलाल जयस्वाल, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **३०/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# जोगेश्वरीतील चाळीत भीषण आग : ११ जण जखमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई –** जोगेश्वरी (पश्चिम) येथील वैशाली नगरमधील गोमती वैशाली चाळ या इमारतीच्या तळमजल्यावरील वीज मीटर केबिनमध्ये लागलेल्या आगीत ११ जण जखमी झाले. शुक्रवारी पहाटे ५.५९ वाजण्याच्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे आग लागली. काही वेळात ही आग वाऱ्यासारखी पसरली आणि परिसरात धुराचे लोट पसरले. या घटनेत पती–पत्नीसह एकाच कुटुंबातील ७ तर अन्य एका कुटुंबातील दोन असे एकूण ११ जण जखमी झाले असून त्यांना कूपर व ट्रॉमा केअर रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. त्या सगळ्यांची प्रकृती स्थिर असल्याचे रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले. जोगेश्वरी (पश्चिम) येथील वैशाली नगर मधील गोमती वैशाली चाळ ही तळ अधिक सहा मजली इमारत आहे. या इमारतीच्या तळमजल्यावरील मीटर बॉक्स मध्ये शॉर्ट सर्किट झाले आणि अग्नी भडका उडाला. इमारतीत धुराचे लोट पसरल्याने काही रहिवासी आत अडकले होते.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५५८/२०२६ ने.ता.३०/०७/२०२६**

**अर्जदार :–** १) राजेंद्र मधुसूदन लोखंडे, वय अं.६५ वर्ष, धंदा–सेवानिवृत्त, रा.वरुड, ह.मु.नागपूर, ता.जि.नागपूर, २) हेम वसंत माकोडे, वय अं.५९ वर्ष, धंदा– गृहीणी, वार्ड क्र.१२, कोठी बाजार, बैतुल ता.जि.बैतुल (म.प.), ३) नंदा संजय लोखंडे, वय अं.५४ वर्ष, धंदा– गृहीणी, ४) अमय संजय लोखंडे, वय अं.२५ वर्ष, धंदा– शिक्षण, ५) कार्तिक संजय लोखंडे, वय अं.३० वर्ष, धंदा– शिक्षण, क्र.३ ते ५ रा.वरुड, जि. अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :–** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी नामे **मयत माया मधुसुदन लोखंडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२९/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**श्री.एम.डी.सैंदाणे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५५९/२०२६ ने.ता.३०/०७/२०२६**

**अर्जदार :–**

१) श्रीमती नंदा भाऊराव घ्यार, वय अं.७७ वर्ष, धंदा–गृहीणी
२) सुरज भाऊराव घ्यार, वय अं.५१ वर्ष, धंदा– शेती
३) त्रिशुला भाऊराव घ्यार, वय अं.४९ वर्ष, धंदा– गृहीणी
४) ऋषीकेश भाऊराव घ्यार, वय अं.४५ वर्ष, धंदा– शेती
क्र.१ ते ४ रा.सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती
५) उज्वला राजकुमार दंडाळे, वय अं.४५ वर्ष, धंदा– गृहीणी रा.साहुर, ता.आष्टी, जि.वर्धा

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :–** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत भाऊराव विश्वनाथराव घ्यार, रा.सुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०१/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५६३/२०२६ ने.ता.०३/०८/२०२६**

**अर्जदार :–**

१) श्रीमती विमल बालचंद्र चव्हाण, वय अं.८५ वर्ष, धंदा–घरकाम, २) प्रमोद बालचंद्र चव्हाण, वय अं.६६ वर्ष, धंदा–मजुरी, क्र.१ व २ रा.फत्तेपुर, ता.वरुड, जि.अमरावती, ३) सुनंदा शंकर भिवरकर, वय अं.६८ वर्ष, धंदा– घरकाम, रा.धामनगांव रेल्वे, ता.धामनगांव रेल्वे, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :–** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत बालचंद्र महादेवराव चव्हाण, रा.फत्तेपुर, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०३/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०१/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५६४/२०२६ ने.ता.३०/०७/२०२६**

**अर्जदार :–**

१) श्रीमती गायत्री दशरथ कुरवाडे, वय अं.२९ वर्ष, धंदा–घरकाम, २) देवांशी दशरथ कुरवाडे, वय अं.५ वर्ष, धंदा–शिक्षण, क्र.१ व २ रा.लिंगा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :–** विमल शंकर कुरवाडे, वय अं.६० वर्ष धंदा–घरकाम, रा.लिंगा, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत दशरथ शंकरराव कुरवाडे, रा.लिंगा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०१/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# ठाकरे गट करणार रामरक्षा आंदोलन, खासदार फोडण्यासाठी राममंदिराचा पैसा : उद्धव ठाकरेंचा आरोप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***मुंबई*** – हिंदुत्वाचा बुरखा घालून राम मंदिर लुटणाऱ्यांचा पैसा इतर राजकीय पक्ष आणि आमदार–खासदार फोडण्यासाठी वापरला जात आहे, असा घणाघाती आरोप करत शिवसेना उबाठा पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी राम मंदिर देणगी घोटाळ्याच्या विरोधात आंदोलनाचे रणशिंग फुंकले. येत्या रविवारी, ५ जुलै रोजी दादरच्या मारुती मंदिर येथे रामरक्षा आंदोलन आणि महाआरती करणार असल्याची घोषणा केली. श्रीराम मंदिराच्या दानपेटीतील निधीच्या अपहाराचे प्रकरण सध्या देशभर गाजत आहे. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी आज 'मातोश्री' निवासस्थानी पत्रकार परिषद घेतली आणि अप्रत्यक्षपणे भाजपच्या विरोधात रस्त्यावर उतरण्याचा निर्णय जाहीर केला. ज्यांना रामाच्या मंदिरात होत असलेली चोरी सहन होत नाही आणि जाब विचारावा वाटतोय त्या सगळ्यांनी या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन करून ते म्हणाले की, या आंदोलनासाठी मी स्वतः तिकडे जाणार असून माझ्यासोबत शिवसेनेचे नेते, लोकप्रतिनिधी असतील. ज्यांनी हिंदुत्व आणि बाळासाहेबांचे विचार सोडलेले नाही ते सुद्धा या आंदोलनात येवू शकतात. अब हिंदू माफ नही करेगा अब हिंदू माफ नहीं करेगा, अशी घोषणा करून ठाकरे म्हणाले की, हे केवळ शिवसेनेचे आंदोलन नाही. त्यामुळे सर्व रामभक्त, हिंदुत्ववादी नागरिक, वारकरी आणि हिंदू समाजाने पक्षभेद बाजूला ठेवून आंदोलनात सहभागी व्हावे.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.एम.डी.सैंदाणे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५०२/२०२६ ने.ता.२३/०७/२०२६**

**अर्जदार :–**

१) सौरभ विष्णु बागडे, वय अं.२७ वर्ष, धंदा–मजुरी
२) गौरव विष्णु बागडे, वय अं.२५ वर्ष, धंदा– मजुरी
क्र.१ व २ रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :–** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत विष्णु सोनीराम बागडे व मयत मिरा विष्णुजी बागडे, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२३/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०१/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५३७/२०२६ ने.ता.०१/०८/२०२६**

**अर्जदार :–**

१) श्रीमती शांताबाई रघुनाथ पाटील, वय अं.७८ वर्ष, धंदा–गृहिणी, २) राजेंद्र रघुनाथ पाटील, वय अं.५० वर्ष, धंदा– शेती, ३) सुनिल रघुनाथ पाटील, वय अं.४६ वर्ष, धंदा– शेती, सर्व रा.खैरगांव, ता.नरखेड, जि.नागपुर, ४) सौ.रंजना सुनिल गहुकर, वय अं.४४ वर्ष, धंदा– गृहिणी, रा.मोहपा, ता.कळमेकर, जि.नागपुर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :–** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत रघुनाथ नत्थुजी पाटील, रा.खैरगांव, ता.नरखेड, जि.नागपुर** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०१/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२५/०६/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५३६/२०२६ ने.ता.२४/०७/२०२६**

**अर्जदार :–**

१) सुखवंती सुखीराम नागवंशी, वय अं.८५ वर्ष, धंदा–काही नाही
२) रमेश सुखीराम नागवंशी, वय अं.५७ वर्ष, धंदा– मजुरी
क्र.१ व २ रा.वरुड, ता.वरुड,

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :–** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत सुखीराम फगनराव नागवंशी, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०१/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु–१/कावी–३२५/२५–२६ दि.०२/०७/२६**

**–: जाहीरनामा :–**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **श्री.अर्जुन तुकाराम यावले, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म–मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ व सुधारणा अधिनियम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे श्री.अर्जुन तुकाराम यावले, रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती यांचा जन्म दि.०४/१२/१९७८** रोजी नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्माची नोंद घ्यावी, या करीता सदर्हू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **०२/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**




# विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी फेरविचार करा

## वरुड तालुका मुख्याध्यापक संघाची तहसिलदारांकडे मागणी



*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांचे नवे शैक्षणिक सत्र कालपासून सुरू होताच आज शाळांमध्ये शिक्षकांना बीएलओ सहाय्यक म्हणुन कार्य करण्याचे आदेश शाळांमध्ये धडकल्याने जिल्ह्यातील शाळांचे प्रशासन, शिक्षक तथा पालक हतबल झाले आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे अटळ असून जिल्हा महसूल प्रशासनाने शिक्षकांना या कामी गुंतविण्याचा फेरविचार करावा, अशी मागणी वरुड तालुका मुख्याध्यापक संघाने सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार वरुड यांना निवेदन देऊन केली आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, उन्हाळी सुटीत जनगणनेचे कार्य शिक्षकांनी केले व हे काम संपताच ते नव्या सत्रासाठी शाळेत हजर झाले तोच त्यांच्या हाती मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण अर्थात एसआयआरचे कामांचे आदेश आले. १ ते ३० जुलै पर्यंत घरोघरी जावून एसआयआरचे काम पूर्ण करायचे आहे त्यामुळे आता शाळा करावी की, हे काम करावे आणि करावे तर कसे?

या व्दिधा मनःस्थिती शिक्षक सापडला आहे तर या शिक्षकांना महिनाभर शाळेत उपस्थित रहाण्यापासून सवलत दिल्यास शिक्षकांअभावी शाळा व शाळेतील विद्यार्थ्यांना सांभाळायचे कसे हा यक्षप्रश्न मुख्याध्यापकांच्या समोर उभा ठाकला आहे.अनेक मुख्याध्यापकांचीही तैनाती एसआयआर कामी करण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे अटळ असून जिल्हा महसूल प्रशासनाने शिक्षकांना या कामी गुंतविण्याचा फेरविचार करावा अशी मागणी वरुड तालुका मुख्याध्यापक संघाने सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार वरुड यांना निवेदन देऊन केली आहे.

प्रत्येक मोठ्या शाळेतील चार ते पाच तथा लहान शाळांमधील दोन शिक्षक गेल्या कित्येक वर्षापासून बीएलओचे कार्य इमानेइतबारे करीत आहेत पण ह्या बीएलओंशिवाय प्रत्येक मोठ्या शाळेतील १६-१६ व लहान शाळांतील ४-५ शिक्षकांना बीएलओ सहाय्यक म्हणून कामाला जुंपल्याने शाळेत मुलांना शिकवेल कोण हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आधीच शिक्षकभरती बंद असल्यामुळे सर्व शाळांमध्ये शिक्षक संख्या अपुरी आहे. शिक्षकांच्या मोठ्या प्रमाणातील रिक्त जागांमुळे आहेत तेव्हढ्या शिक्षकांवर अध्यापनाचा व इतर शैक्षणिक कामांचा ताण वाढला आहे अशात हा आणखी बोझा येऊन पडल्याने शिक्षक तर तणावग्रस्त झालेच आहेत पण पालक सुद्धा चिंतित झाले आहेत. शिक्षकांवरील अतिरिक्त ताण कमी करावा व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे .

धाराशिवच्या जिल्हाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शिक्षकांच्या ऐवजी पर्यायी व्यवस्था केल्याचे वृत्त आहे. तशीच व्यवस्था वरुड तालुक्यातही करावी अशी मागणी मुख्याध्यापक संघटनेने केली आहे. यावेळी तालुक्यातील सर्वच खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एकनाथ शिंदेंना कामाचा अतिताण, उपचारासाठी ठाण्यातील खासगी रुग्णालयात दाखल

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे (शिंदे गट) सर्वेसर्वा एकनाथ शिंदे यांना अचानक रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. एकनाथ शिंदे यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना शुक्रवारी ठाण्यातील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे.







